# गृह विभाग

## अर्थसंकल्प : २०२३-२४

### महाराष्ट्र शासन


**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

**समर्थन**

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**

संपादन : **मुक्ता भारती /हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण आणि संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

विशेष सहाय्य :
**निलम काकड, स्नेहा घरत, विलास सुवरे, राजश्री कदम व उमेश सांगळे**

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏ ०२२-२२००३०६०
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१५-१६ पासून २०२१-२२ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२२-२३ सुधारित अंदाज तसेच २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन:
रुपेश कीर -९८९२९३९६१७

**मार्गदर्शक-विवेक पंडित**
संस्थापक, समर्थन

# गृह विभाग - अर्थसंकल्प सन २०२३-२४

## ठळक वैशिष्ट्ये

गृह विभाग अर्थसंकल्प :

- सन २०२३-२४चा गृह विभागाचा अर्थसंकल्प रु.३५ हजार ४९९ कोटी ८३ लाखांचा आहे. राज्याच्या एकूण अर्थसंकल्पात गृह विभागाचे प्रमाण ४.४१% आहे.
- सन २०१५-१६ ते २०२१-२२ या कालावधीत राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत गृह विभागावर सरासरी ५.४१% खर्च झाला आहे.
- सन २०१५-१६ ते २०२१-२२ या ७ वर्षात गृह विभागावर सरासरी रु. १७ हजार ५५ कोटी खर्च करण्यात आले आहेत. त्यापैकी पोलीस खात्यावर सरासरी रु.१३ हजार ४७२ कोटी खर्च करण्यात आले.
- सन २०१५-१६ ते २०२१-२२ या ७ वर्षाच्या कालावधीतील सन २०१९-२० या वर्षात गृह विभागावर सर्वात जास्त रक्कम रु. १९ हजार ९२१ कोटी खर्च झाले होते.
- वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या ७ वर्षाच्या कालावधीमध्ये पोलीस खात्यावर सरासरी १३ हजार ४७२ कोटी रुपये खर्च करण्यात आले. गृह विभागाच्या तुलनेत पोलीस खात्यावर झालेला खर्चाचे प्रमाण ७८.९९% आहे. तर उर्वरित २१.०९ % खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.
- सन २०१५-१६ ते २०२१-२२ या ७ वर्षाच्या कालावधीतील सन २०१९-२० या वर्षात पोलीस खात्यावर सर्वात जास्त रु. १६ हजार १४७ कोटी खर्च झाले होते.

*(स्त्रोत:अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, २०१७-१८ ते २०२३-२४, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)*

## पोलीस:

- महाराष्ट्राची वर्ष २०२१ची अंदाजित लोकसंख्या १२ कोटी ४९ लाख इतकी असून माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यातील पोलिसांची मंजूर संख्याबळ २ लाख २१ हजार २५९ इतकी असून त्यापैकी १ लाख ८७ हजार ९३१ इतकी पदे भरली गेली आहेत, तर ३३ हजार ३२८ पदे रिक्त आहेत. पोलिसांवरील ताण वाढत असून १ लाख लोकसंख्येमागे १६९ पोलीस उपलब्ध आहेत.

- महाराष्ट्रात महिला पोलिसांची संख्या ३१ हजार २२३ इतकी असून एकूण पोलीस संख्याबळाच्या तुलनेत ही संख्या १६.६१% इतकी आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होण्याची आवश्यकता आहे.

- महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात पोलीस अधिकारी व कर्मचारी मिळून २ लाख ११ हजार १८३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ८३ हजार ६१८ पोलिसांना निवासस्थाने उपलब्ध झाली आहेत. तर आजही राज्यातील ७१ हजार ८२४ (३४.०१%) पोलीस निवासस्थानापासून वंचित आहेत.

- मुंबई पोलीस आयुक्तालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई पोलिसांचे संख्याबळ ३२ हजार १२१ इतके असून त्यापैकी २४ हजार ९९६ पोलिसांना निवासस्थान उपलब्ध झाले आहे, तर आजही ७ हजार १२५ (७७.८२%) पोलिसांना निवासस्थानांची कमतरता आहे.

- राज्याच्या अप्पर पोलीस महासंचालकांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार नागरी हक्क संरक्षण कक्षात पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदार यांची ३९८ पदे मंजूर असून त्यापैकी ३८४ पदे भरली गेली असून १४ पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमध्ये पोलीस अधीक्षकांची ३, पोलीस उप अधीक्षक ४ व पोलीस अंमलदारांची ७ पदे रिक्त आहेत.

*(स्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती)*

## भारतात व महाराष्ट्रात घडलेल्या गुन्ह्यांचे तुलनात्मक विश्लेषण:


- सन २०२१ मध्ये भारतात ६० लाख ९६ हजार ३१० गुन्हे नोंदवले गेले असून, नोंदविलेल्या एकूण गुन्ह्यांमध्ये १) तामिळनाडू - ७ लाख ५६ हजार ७५३, २) गुजरात - ७ लाख ३१ हजार ७३८, ३) उत्तर प्रदेश - ६ लाख ८ हजार ८२, तर ४) महाराष्ट्र - ५ लाख ४० हजार ८०० इतके गुन्हे दाखल झाले असून महाराष्ट्र ४ थ्या क्रमांकावर आहे.
- महाराष्ट्रात सन २०२१ मध्ये ५ लाख ४० हजार ८०० गुन्ह्यांची नोंद झाली होती. भारतात एकूण घडलेल्या ६० लाख ९६ हजार ३१० गुन्ह्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील गुन्ह्यांचे प्रमाण ८.८७% आहे.
- सन २०२१ मध्ये देशात ३० हजार १३२ खुनाचे गुन्हे नोंदविले गेले असून त्यापैकी सर्वात जास्त उत्तर प्रदेश - ३ हजार ८२५ (१३.००%), दुसऱ्या क्रमांकावर बिहार -२ हजार ८२६ (९.३८%), त्यानंतर महाराष्ट्रात २ हजार ३८१ (७.९०%) खुनाची प्रकरणे नोंदविली गेली असून महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे.
- सन २०२१ मध्ये भारतात मानवी शरीरावर परिणाम करणारे ११ लाख ५५ हजार ९४२ गुन्हे घडले असून प्रथम क्रमांकावर उत्तर प्रदेश १ लाख ३९ हजार ९५२ गुन्हे, दुसऱ्या क्रमांकावर मध्य प्रदेश १ लाख ३३ हजार ९८४ गुन्हे, तिसऱ्या क्रमांकावर बिहार १ लाख २५ हजार १२७ गुन्हे तर चौथ्या क्रमांकावर महाराष्ट्र असून महाराष्ट्रात १ लाख ५७७ गुन्हे घडले आहेत.
- भारतात संपत्तीवरील वादाचे ७ लाख ६६ हजार ६५७ गुन्हे घडले असून त्यापैकी सर्वात जास्त गुन्हे महाराष्ट्रात घडले आहेत, त्यांची संख्या ९१ हजार ८४२ इतकी असून त्याचे प्रमाण ११.९८% इतके मोठे आहे.
- सन २०२१ मध्ये भारतात महिलांवरील अत्याचाराचे ४ लाख २८ हजार २७८ गुन्ह्यांची नोंद झाली असून प्रथम क्रमांकावर उत्तर प्रदेश - ५६ हजार ८३ (१३.०९%), दुसऱ्या क्रमांकावर राजस्थान - ४० हजार ७३८ तर महाराष्ट्र - ३९ हजार ५२६ गुन्ह्यांची नोंद झाली असून महिलांवरील अत्याचारात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे.

- सन २०२० मध्ये मुलांवरील अत्याचाराचे देशात १ लाख ४९ हजार ४०४ गुन्हे नोंदविले गेले. त्यापैकी सर्वात जास्त मध्य प्रदेशात १९ हजार १७३ (१२.८३%), त्यानंतर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर असून महाराष्ट्रात १७ हजार २६१ (११.५५%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- अनुसूचित जातीच्या व्यक्तींवर झालेल्या अत्याचाराचे देशात ५० हजार ९०० गुन्हे नोंदविले गेले असून त्यापैकी महाराष्ट्रात २ हजार ५०३ (४.९२%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- अनुसूचित जमातीवरील अत्याचाराचे देशात ८ हजार ८०२ गुन्हे नोंदविले गेले. त्यापैकी मध्य प्रदेशात २ हजार ६२७ (२९.८५%), राजस्थान २ हजार १२१ (२४.१०%) तर महाराष्ट्रात ६२८(७.१३%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- भारतात ज्येष्ठ नागरिकांवर झालेल्या अत्याचाराचे २६ हजार ११० गुन्हे नोंदविले गेले त्यापैकी सर्वात जास्त ६ हजार १९० (२३.७०%) गुन्हे महाराष्ट्रात नोंदविले गेले आहेत.
- भारतात आर्थिक गुन्हेगारीची १ लाख ७४ हजार १३ प्रकरण नोंदविली गेली त्यापैकी सर्वात जास्त १) राजस्थान - २३ हजार ७५७ (१३.६५%), २) तेलंगणा - २० हजार ७५९ (११.९३), ३) उत्तर प्रदेश - २० हजार २६ (११.५१%), तर ४) महाराष्ट्रात १५ हजार ५५० (८.९४%) प्रकरण नोंदविली गेली आहेत.
- भारतात भ्रष्टाचार व गैरव्यवहार यातील ३ हजार ७४५ इतक्या गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी महाराष्ट्रात ७७३ (२०.६४%) गुन्हे नोंदविले गेले असून याबाबत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे.
- भारतात सायबर क्राईम मध्ये  ५२ हजार ९७४ गुन्ह्यांची नोंद झाली. त्यापैकी सर्वात जास्त १) तेलंगणा  -१० हजार ३०३ (१९.४५%), २) उत्तर प्रदेश - ८ हजार ८२९ (१६.६६%), ३) कर्नाटक -८ हजार १३६ (१५.३५%) त्यानंतर चौथ्या क्रमांकावर महाराष्ट्र  - ५ हजार ५६२ (१०.५०%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- राज्याविरोधात कारवाईमध्ये भारतात एकूण ५ हजार १६४ गुन्हे नोंदविले गेले असून त्यापैकी प्रथम क्रमांकावर उत्तर प्रदेश-१ हजार ८६२ (३६.०५%), दुसऱ्या क्रमांकावर तामिळनाडू - ६५४ (१२.६६%), तिसऱ्या क्रमांकावर आसाम - ३२७ (६.३३%) तर चौथ्या क्रमांकावर जम्मु आणि काश्मीर -३१३ (६.०६), ५व्या क्रमांकावर पश्चिम बंगाल -२७४ (५.३१) तर ६व्या क्रमांकावर महाराष्ट्र  - २१८ (४.२२%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

*(स्त्रोत: भारतातील गुन्हेगार, २०२१, राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण संस्था, गृह विभाग, भारत सरकार )*

# गृह विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा सुधारित अंदाज जास्त प्रत्यक्ष खर्च मात्र त्यापेक्षाही कमी

आलेख क्र. १ (रु. कोटीत)




| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | १४६०० | १५०९० | १७००७ | १७९६८ | २१७०६ | २५२९६ | २१४०५ | २४५८७ | ३५४९९ |
| सुधारित अंदाज | १५०३३ | १७३११ | १६५३९ | १८४२९ | २१८७८ | २२४८७ | १८८९१ | ३१६८५ | |
| प्रत्यक्ष खर्च | १३१११ | १५९३५ | १५०२० | १६३२१ | १९९२१ | १५४९४ | २३५८७ | | |

*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका) वर्ष २०२३-२४, सुधारित अंदाज २०२२-२३ व अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२४)*

- **वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या ७ वर्षाच्या कालावधीत एकाही वर्षात गृह विभागाला प्रत्यक्ष खर्चासाठी सुधारित अंदाजाच्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नसल्याचे दिसते.**

- **वर्ष २०१६-१७ मध्ये गृह विभागाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. १५ हजार ९० कोटींचे होते त्या तुलनेत रु. १५ हजार ९३५ कोटी उपलब्ध झाले. म्हणजे रु. ८४५ कोटी अधिकचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र त्यानंतर एकाही वर्षी अर्थसंकल्पीय अंदाजाइतका निधी उपलब्ध झालेला नाही.**


- **सन २०१५-१६ ते २०२१-२२ या ७ वर्षात गृह विभागावर सरासरी रु. १७ हजार ५५ कोटी खर्च करण्यात आले होते. त्यापैकी पोलीस खात्यावर सरासरी रु. १३ हजार ४७२ कोटी खर्च करण्यात आले.**

- **सन २०१५-१६ ते २०२१-२२ या ७ वर्षाच्या कालावधीत गृह विभागावर सन २०१९-२० या वर्षात सर्वात जास्त रक्कम रु. ९ हजार ९२१ कोटी खर्च झाले होते.**

- **वर्ष २०२०-२१ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. २५ हजार २९६ कोटी असून देखील त्यावर्षी निधी उपलब्ध होण्याचे प्रमाण मात्र सर्वात कमी म्हणजेच रु. १५ हजार ४९४ कोटी (६१.२५%) आहे.**

# राज्य अर्थसंकल्पाच्या १०० रुपयाच्या तुलनेत गृह विभागाला मिळतात फक्त ५.४० रुपये

आलेख क्र. २




*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)*
*वर्ष २०२२-२२ सुधारित अंदाज व वर्ष २०२३-२४ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या ७ वर्षाच्या कालावधीत गृह विभागावर एकूण राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी ५.४२ % एवढाच निधी उपलब्ध झाला.
- वर्ष २०२०-२१ मध्ये उपलब्ध निधी हा इतर वर्षांच्या तुलनेत कमी म्हणजेच ३.८५ % दिसून येतो.
- वर्ष २०१६-१७ मध्ये गृह विभागाचे उपलब्ध निधीचे प्रमाण पाहता इतर वर्षाच्या तुलनेत जास्त म्हणजेच ६.२०% इतके होते.
- वर्ष २०१६-१७ मध्ये राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत गृह विभागाच्या अर्थसंकल्पातील खर्चाचे प्रमाण ६.२० % इतका झाला होता. हे वर्ष वगळता, वर्ष २०१५-१६ ते २०२१-२२ या ७ वर्षाच्या कालावधीत राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत ५.४१% ही खर्च झालेला नाही.
- सन २०१५-१६ ते २०२१-२२ या ७ वर्षात गृह विभागावर सरासरी रु. १७ हजार ५५ कोटी खर्च करण्यात आले आहेत. त्यापैकी पोलीस खात्यावर सरासरी रु. १३ हजार ४७२ कोटी रुपये खर्च करण्यात आले.


# पोलीस

*“कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्याचा शोध घेणे आणि गुन्हे टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे ही पोलीसांची मुख्य कामे आहेत. शिवाय गुन्हे टाळणे, गुन्हेगारांवर खटले भरणे, कैद्यांना तसेच सरकारी तिजोरी, खाजगी तसेच सार्वजनिक मालमत्तेला संरक्षण देणे, वाहतूक सुव्यवस्था चालू ठेवणे, स्फोटक पदार्थांची तपासणी करणे, पूर्वचारित्र्य तपासून पाहणे ही महत्त्वाची कामेही पोलीस करतात, या व्यतिरिक्त सामाजिक, आर्थिक विविधता कार्यान्वीत करण्यासाठीसुध्दा पोलीसांना कामगिरी बजावावी लागते. ”*

– गृह विभाग, कार्यक्रम अंदाजपत्रक, २०२३-२४

## पोलीस या मुख्य शीर्षावरील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च

आलेख क्र.३ (रु. कोटीत)





| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ११८५३ | ११५७९ | १२७५३ | १३८६६ | १७२३३ | २०२३० | २१५५८ | २४६६३ | २६५२४ |
| सुधारित अंदाज | ११६३२ | १२४०४ | १२५४४ | १२३४५ | १४००४ | १७११६ | १७५३७ | २१४०९ | |
| प्रत्यक्ष खर्च | ९९१६ | ११७३७ | ११३९९ | १२३२१ | १६१४७ | १५३६१ | १७४२६ | | |

*स्त्रोत: खर्चाचा प्रधान शीर्षवार नि-विभागवार सारांश -लोकलेखा-मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील २०२२-२३ सुधारित अंदाज व २०२३-२४ अंदाजित खर्च*

- **वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या कालावधीमध्ये पोलीस या मुख्य शीर्षासाठी वर्ष २०१६-१७चा अपवाद वगळता शासनाने अर्थसंकल्पीय अंदाजा इतका निधी उपलब्धच केला नसल्याचे दिसून येते.**
- **वर्ष २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु.११ हजार ५७९ कोटी असताना प्रत्यक्ष उपलब्ध झालेला निधी रु. १ हजार १५८ कोटी इतका वाढून त्या वर्षातील खर्च रु. ११ हजार ७३७ कोटी इतका झाला.**
- **वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या कालावधीमध्ये पोलीस या मुख्य शीर्षासाठी शासनाने सुधारित अंदाजा इतका निधी उपलब्धच केला नसल्याचे दिसून येते.**
- **वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या ७ वर्षाच्या कालावधीमध्ये पोलीस खात्यावर सरासरी रु. १३ हजार ४७२ कोटी खर्च करण्यात आले. गृह विभागाच्या तुलनेत पोलीस खात्यावर झालेला खर्चाचे प्रमाण ७८.९९% आहे. तर उर्वरित २१.०१ % खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.**

# राज्याचा पोलिसांसाठी सरासरी उपलब्ध निधी फक्त ४.११ %

आलेख क्र. ४




*(स्रोत : खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च)*
*वर्ष २०२२-२३चे सुधारित अंदाज व वर्ष २०२३-२४चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या कालावधीत राज्याच्या उपलब्ध निधीच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील उपलब्ध होणारा निधीचे सरासरी प्रमाण हे फक्त ४.११ % दिसून येते.**
- **वर्ष २०१८-१९ च्या मध्ये उपलब्ध झालेला निधी आतापर्यंतच्या नीचांकावर केवळ ३.७५ % आहे.**

# राज्याचा गृह विभागावरील व पोलीस या मुख्य शीर्षावरील खर्चातील फरक

तक्ता क्र.१ *(रु. कोटीत)*

| वर्ष | गृह विभागावरील खर्च | पोलीस शीर्षावरील खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१५-१६ | १३,१११ | ९,९१६ | ७५.६३ |
| २०१६-१७ | १५,९३५ | ११,७३७ | ७३.६५ |
| २०१७-१८ | १५,०२१ | ११,३९९ | ७५.८८ |
| २०१८-१९ | १६,३२१ | १२,३२१ | ७५.४९ |
| २०१९-२० | १९,९२१ | १६,१५१ | ८१.०८ |
| २०२०-२१ | २०,१३० | १५,३६१ | ७६.३१ |
| २०२१-२२ | २३,५८७ | १७,४२६ | ७३.८८ |
| २०२२-२३ | ३१,६८५ | २१,४०९ | ६७.५६ |
| २०२३-२४ | ३५,४९९ | २६,५२४ | ७४.७१ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च*

- **वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या कालावधीतील गृह विभागावरील एकूण खर्चाच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील खर्चाचे सरासरी प्रमाण ८६.८३ % आहे म्हणजेच उर्वरित १३.१७ % खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.**

## *पोलिसांवरील वाढता ताण :*
## *महाराष्ट्रात १ लाख लोकसंख्येमागे केवळ १६९ पोलीस*

**महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या अंदाजित १२ कोटी ४९ लाख एवढी असून २०२१ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्ष पोलीस संख्याबळ १ लाख ८७ हजार ९३१ आहे. म्हणजेच एक लाख लोकसंख्येसाठी १६९ पोलीस आहेत. महाराष्ट्रात महिला पोलिसांची संख्या ३१ हजार २३३ इतकी असून एकूण पोलीस संख्याबळाच्या तुलनेत ही संख्या १६.६१% इतकी आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होण्याची आवश्यकता आहे.**

*- स्रोत : माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, २०२३*

## *महाराष्ट्र राज्यात महिला पोलिसांचे प्रमाण नगण्य*

**राज्यात १ लाख ८७ हजार ९३१ पोलीस कार्यरत असून त्यापैकी महिलांची संख्या ३१ हजार २२३ इतकी आहे. एकूण पोलिसांच्या प्रमाणात १६.६१% इतके कमी आहे. राज्यात महिलांची संख्या ६ कोटी २० लाख असून त्या प्रमाणात महिलांची भरती पोलीस विभागात होणे गरजेचे आहे.**

*- स्रोत : माहितीच्या अधिकारात प्राप्त माहिती, २०२३*

# कारागृह - राज्यात १६ हजार ३५३ बंदी अतिरिक्त

## कारागृहातील बंदी क्षमता २४ हजार ७२२ तर एकूण बंदी ४१ हजार ७५

तक्ता क्र. २

### कारागृहनिहाय अधिकृत बंदीक्षमता व प्रत्यक्ष बंदीसंख्या दि.३१/०१/२०२३

| अ. क्र. | कारागृहाचे नांव | अधिकृत बंदीसंख्या | | | एकूण प्रत्यक्ष बंदीसंख्या | | | | बंदीक्षमतेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | तृतीय पंथी | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| **अ)** | **मध्यवर्ती कारागृह** | | | | | | | | |
| १ | अमरावती म.का. | ९३९ | ३४ | ९७३ | १३७५ | ४८ | ० | १४२३ | १४६ |
| २ | नागपूर म.का. | १६९८ | १४२ | १८४० | २७३५ | १०७ | ० | २८४२ | १५४ |
| ३ | औरंगाबाद म.का. | ११५३ | ६१ | १२१४ | १५१७ | ५१ | ० | १५६८ | १२९ |
| ४ | नाशिकरोड म.का. | ३११८ | ९० | ३२०८ | २७३२ | ८४ | ० | २८१६ | ८८ |
| ५ | कोल्हापूर म.का. | १७५५ | ३४ | १७८९ | १८७८ | ५८ | १ | १९३७ | १०८ |
| ६ | येरवडा म.का. | २३२३ | १२६ | २४४९ | ६७५३ | २३१ | ५ | ६९८९ | २८५ |
| ७ | मुंबई म.का | ८०४ | ० | ८०४ | ३५८३ | ० | ० | ३५८३ | ४४६ |
| ८ | ठाणे म.का. | १०८० | २५ | ११०५ | ४१७० | १२७ | ६ | ४३०३ | ३८९ |
| ९ | तळोजा म.का. | २१२४ | ० | २१२४ | ३०७९ | ० | ० | ३०७९ | १४५ |
| | **एकूण-अ** | **१४९९४** | **५१२** | **१५५०६** | २७८२२ | ७०६ | १२ | २८५४० | १८४ |
| **(ब)** | **जिल्हा कारागृह** | | | | | | | | |
| १० | अकोला जि.का. वर्ग-१ | ६७३ | २२ | ६९५ | ३१४ | १७ | ० | ३३१ | ४८ |
| ११ | भंडारा जि.का. वर्ग-१ | ३३८ | ५ | ३४३ | ३८१ | ८ | ० | ३८९ | ११३ |
| १२ | चंद्रपूर जि.का. वर्ग-१ | ३२२ | ११ | ३३३ | ६६१ | ३२ | ० | ६९३ | २०८ |
| १३ | यवतमाळ जि.का. वर्ग-१ | २२४ | ५ | २२९ | ५८८ | ० | ० | ५८८ | २५७ |
| १४ | वर्धा जि.का. वर्ग-१ | २४३ | ९ | २५२ | ४७३ | १५ | १ | ४८९ | १९४ |
| १५ | धुळे जि.का. वर्ग-१ | २८५ | ९ | २९४ | २६१ | ४ | ० | २६५ | ९० |
| १६ | लातूर जि. का. वर्ग-१ | ४८० | २० | ५०० | २८१ | १६ | ० | २९७ | ५९ |
| १७ | भायखळा जि.का. वर्ग-१ | २०० | ० | २०० | ४२२ | ० | ० | ४२२ | २११ |
| १८ | कल्याण जि.का. वर्ग-१ | ५०५ | ३५ | ५४० | १८९० | १४० | ० | २०३० | ३७६ |
| १९ | बुलढाणा जि.का. वर्ग-२ | ९७ | ४ | १०१ | ३७६ | १५ | ० | ३९१ | ३८७ |
| २० | वाशिम जि.का. वर्ग-२ | १७० | ३० | २०० | १६२ | १० | ० | १७२ | ८६ |
| २१ | बीड जि.का. वर्ग-२ | १४४ | १७ | १६१ | २८९ | १३ | ० | ३०२ | १८८ |
| २२ | जालना जि.का. वर्ग-२ | ५२६ | ३० | ५५६ | १८५ | १८ | १ | २०४ | ३७ |
| २३ | जळगांव जि.का. वर्ग-२ | १८६ | १४ | २०० | ४४४ | १९ | ० | ४६३ | २३२ |
| २४ | नांदेड जि.का. वर्ग-२ | १४५ | १५ | १६० | ४९२ | १७ | ० | ५०९ | ३१८ |
| २५ | नंदुरबार जि.का. वर्ग-२ | ४५० | ५० | ५०० | १५९ | १३ | ० | १७२ | ३४ |
| २६ | परभणी जि.का. वर्ग-२ | २४० | १२ | २५२ | ३९२ | १२ | ० | ४०४ | १६० |
| २७ | उस्मानाबाद जि.का. वर्ग-२ | २४२ | २७ | २६९ | २६२ | ९ | ० | २७१ | १०१ |
| २८ | अहमदनगर जि.का वर्ग-२ | ६३ | ६ | ६९ | १६७ | ० | ० | १६७ | २४२ |
| २९ | सांगली जि.का. वर्ग-२ | २०५ | ३० | २३५ | २३१ | ८ | ० | २३९ | १०२ |
| ३० | सातारा जि.का. वर्ग-२ | १५९ | ९ | १६८ | ३४५ | १७ | ० | ३६२ | २१५ |
| ३१ | सोलापूर जि.का. वर्ग-२ | १२७ | १४ | १४१ | ४७० | ३८ | ० | ५०८ | ३६० |
| ३२ | अलिबाग जि.का. वर्ग-२ | ८० | २ | ८२ | १९५ | १५ | ० | २१० | २५६ |
| ३३ | सावंतवाडी जि.का. वर्ग-२ | ५६ | २२ | ७८ | ६० | ० | ० | ६० | ७७ |

# कारागृहनिहाय अधिकृत बंदीक्षमता व प्रत्यक्ष बंदीसंख्या दि.३१/०१/२०२३

| अ. क्र. | कारागृहाचे नांव | अधिकृत बंदीसंख्या | | | एकूण प्रत्यक्ष बंदीसंख्या | | | | बंदीक्षमतेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | तृतीय पंथी | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ३४ | सिंधुदुर्ग जि.का. वर्ग-२ | १७६ | २४ | २०० | ५२ | ० | ० | ५२ | २६ |
| ३५ | भुसावळ जि.का. वर्ग-३ | ६० | ० | ६० | ४८ | ० | ० | ४८ | ८० |
| ३६ | कोल्हापूर जि.का. वर्ग-३ | १०४ | २१ | १२५ | २५० | १२ | ० | २६२ | २१० |
| ३७ | जे.जे. रुग्णालय का. वर्ग-३ | २० | ० | २० | ९ | ० | ० | ९ | ४५ |
| | **एकूण-ब** | **६५२०** | **४४३** | **६९६३** | ९८५९ | ४४८ | २ | १०३०९ | १४८ |
| **क)** | **विशेष कारागृह** | | | | | | | | |
| ३८ | रत्नागिरी विशेष. का वर्ग-१ | **२४३** | **३** | **२४६** | १९५ | १० | ० | २०५ | ८३ |
| **ड)** | **महिला कारागृह** | | | | | | | | |
| ३९ | मुंबई जिल्हा महिला का. वर्ग-१ | **०** | **२६२** | **२६२** | ० | ३२५ | १ | ३२६ | १२४ |
| **इ)** | **किशोर सुधारालय** | | | | | | | | |
| ४० | किशोर सु. नाशिक वर्ग-१ | **१०५** | **०** | **१०५** | ६ | ० | ० | ६ | ६ |
| **फ)** | **खुले कारागृह** | | | | | | | | |
| ४१ | मोर्शी खु.का. वर्ग-१ | २०० | ० | २०० | १२३ | ० | ० | १२३ | ६२ |
| ४२ | गडचिरोली खु.का.वर्ग-१ | ७५ | ० | ७५ | ५९ | ० | ० | ५९ | ७९ |
| ४३ | पैठण खु.का. वर्ग-१ | ५०० | ० | ५०० | ३४१ | ० | ० | ३४१ | ६८ |
| ४४ | येरवडा खु.का. वर्ग-१ | १७२ | ० | १७२ | १७६ | ० | ० | १७६ | १०२ |
| ४५ | औरंगाबाद खु.का.वर्ग-२ | ५० | ० | ५० | ४९ | ० | ० | ४९ | ९८ |
| ४६ | विसापूर खु. का. वर्ग-२ | २०० | ० | २०० | १३१ | ० | ० | १३१ | ६६ |
| ४७ | अमरावती खु.का. वर्ग-३ | ५० | ० | ५० | ६५ | ० | ० | ६५ | १३० |
| ४८ | नागपूर खु.का. वर्ग-३ | ५० | ० | ५० | १३८ | ० | ० | १३८ | २७६ |
| ४९ | अकोला महिला खु.का. वर्ग-३ | ० | ५० | ५० | ० | २८ | ० | २८ | ५६ |
| ५० | नाशिकरोड खु.का. वर्ग-३ | ५० | ० | ५० | २६८ | ० | ० | २६८ | ५३६ |
| ५१ | कोल्हापूर खु.का. वर्ग-३ | ५० | ० | ५० | १६८ | ० | ० | १६८ | ३३६ |
| ५२ | येरवडा महिला खु.का. वर्ग-३ | ० | ५० | ५० | ० | ३९ | ० | ३९ | ७८ |
| ५३ | ठाणे खु.का. वर्ग-३ | २५ | ० | २५ | १७ | ० | ० | १७ | ६८ |
| ५४ | यवतमाळ खु.का. वर्ग-३ | १५ | ० | १५ | १० | ० | ० | १० | ६७ |
| ५५ | वर्धा खु.का. वर्ग-३ | १५ | ० | १५ | १५ | ० | ० | १५ | १०० |
| ५६ | धुळे खु.का. वर्ग-३ | १५ | ० | १५ | १४ | ० | ० | १४ | ९३ |
| ५७ | लातूर खु. का. वर्ग-३ | १५ | ० | १५ | १२ | ० | ० | १२ | ८० |
| ५८ | रत्नागिरी खु.का. वर्ग-३ | १५ | ० | १५ | १४ | ० | ० | १४ | ९३ |
| ५९ | सिंधुदुर्ग खु.का. वर्ग-३ | १५ | ० | १५ | १२ | ० | ० | १२ | ८० |
| | **एकूण फ** | **१५१२** | **१००** | **१६१२** | **१६१२** | **६७** | **०** | **१६७९** | **१०४** |
| **ग)** | **इतर कारागृह** | | | | | | | | |
| ६० | खुली वसाहत,आटपाडी वर्ग-३ | **२८** | **०** | **२८** | १० | ० | ० | १० | ४३ |
| | **एकूण( अ ते ग )** | **२३४०२** | **१३२०** | **२४७२२** | **३९५०४** | **१५५६** | **१५** | **४१०७५** | **१६६** |

*(स्त्रोत : कारागृह सांख्यिकी)*

- जानेवारी २०२३ पर्यंत मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह विशेष कारागृह, महिला कारागृह, किशोर सुधारालय, खुले कारागृह व इतर कारागृह यांची एकत्रित अधिकृत बंदी क्षमता २४ हजार ७२२ इतकी होती. त्यामध्ये दि. ३१ जानेवारी, २०२३ पर्यंत ४१ हजार ७५ बंदी ठेवण्यात आले होते. म्हणजे उपलब्ध क्षमतेपेक्षा १६६ % म्हणजे १६ हजार ३५३ अधिकचे बंदी कारागृहात ठेवण्यात आले होते. हे एकाप्रकारे मानवी हक्कांचा भंगच म्हणावा लागेल.
- मध्यवर्ती कारागृहात १५ हजार ५०६ची अधिकृत बंदी क्षमता असताना २८ हजार ५४० बंदी ठेवण्यात आले होते. म्हणजे १३ हजार ३४ कैदी अतिरिक्त होते. तर जिल्हा कारागृह व इतर कारागृहांमध्ये ९ हजार २१६ कैदी क्षमता असताना १२ हजार ५३५ कैदी ठेवण्यात आले होते. याचा अर्थ या कारागृहांमध्ये ३ हजार ३१९ कैदी अतिरिक्त होते.

### अतिरिक्त तुरुंग उभारा – उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला आदेश

मुंबई व पुण्यासह राज्यभरातील तुरुंगामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्याने आणि तुरुंगाची स्थिती समाधानकारक नसल्याने त्याविषयी चिंता व्यक्त करतानाच मुंबई व पुण्यात अतिरिक्त तुरुंगांची उभारणी करण्याकरिता राज्य सरकारने तीन महिन्यांच्या आत योग्य ती पावले उचलावीत, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिला.

### कैद्यांना सुविधा पुरवा!

#### मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

राज्यभरातील तुरुंगात असलेल्या हजारो कैद्यांच्या आरोग्याबाबत जिल्हावार आहार तज्ज्ञांनी पूर्वसूचना न देता आकस्मिक करावयाची आहे, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही.

# राज्यातील बंदीक्षमते पेक्षा दुप्पट व त्यापेक्षा जास्त असलेली १८ कारागृहे!

तक्ता : ३

| बंदीक्षमते पेक्षा दुप्पट व त्यापेक्षा जास्त बंदी असलेली १८ कारागृहे, माहे जानेवारी-२०२३ अखेरची | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कारागृहांची नांवे | बंदीक्षमता | प्रत्यक्ष बंदीसंख्या | टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नाशिकरोड खुले कारागृह वर्ग-३ | ५० | २६८ | ५३६ |
| २ | मुंबई मध्यवर्ती कारागृह | ८०४ | ३५८३ | ४४६ |
| ३ | ठाणे मध्यवर्ती कारागृह | ११०५ | ४३०३ | ३८९ |
| ४ | बुलढाणा जिल्हा कारागृह वर्ग-२ | १०१ | ३९१ | ३८७ |
| ५ | कल्याण जिल्हा कारागृह वर्ग-१ | ५४० | २०३० | ३७६ |
| ६ | सोलापूर जिल्हा कारागृह वर्ग-२ | १४१ | ५०८ | ३६० |
| ७ | कोल्हापूर खुले कारागृह वर्ग-३ | ५० | १६८ | ३३६ |
| ८ | नांदेड जिल्हा कारागृह वर्ग-२ | १६० | ५०९ | ३१८ |
| ९ | येरवडा मध्यवर्ती कारागृह | २४४९ | ६९८९ | २८५ |
| १० | नागपूर खुले कारागृह वर्ग-३ | ५० | १३८ | २७६ |
| ११ | यवतमाळ जिल्हा कारागृह वर्ग-१ | २२९ | ५८८ | २५७ |
| १२ | अलिबाग जिल्हा कारागृह वर्ग-२ | ८२ | २१० | २५६ |
| १३ | अहमदनगर जिल्हा कारागृह वर्ग-२ | ६९ | १६७ | २४२ |
| १४ | जळगांव जि.का. वर्ग-२ | २०० | ४६३ | २३२ |
| १५ | सातारा जिल्हा कारागृह वर्ग-२ | १६८ | ३६२ | २१५ |
| १६ | भायखळा जिल्हा कारागृह वर्ग-१ | २०० | ४२२ | २११ |
| १७ | कोल्हापूर जिल्हा कारागृह वर्ग-३ | १२५ | २६२ | २१० |
| १८ | चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-१ | ३३३ | ६९३ | २०८ |

- राज्यातील बंदीक्षमतेपेक्षा दुप्पट व त्यापेक्षा जास्त बंदी असलेली १८ कारागृहांत मिळून ६ हजार ८५६ बंदी क्षमता असून प्रत्यक्ष बंदी क्षमता २२ हजार ५४ इतकी मोठी आहे. याचा अर्थ या कारागृहांमध्ये १५ हजार १९८ बंदी अधिकचे आहेत. त्याचे प्रमाण ३२२ टक्के आहे.
- येरवडा मध्यवर्ती कारागृहात २ हजार ४४९ अधिकृत बंदीक्षमता असून प्रत्यक्ष बंदीक्षमता ६ हजार ९८९ इतकी मोठी असून या कारागृहात अतिरिक्त बंदी ४ हजार ५४० इतके आहेत. त्याचे प्रमाण २८५% इतके आहे.
- ठाणे मध्यवर्ती कारागृहात १ हजार १०५ अधिकृत बंदीक्षमता असून प्रत्यक्ष बंदीक्षमता ४ हजार ३०३ इतकी मोठी असून या कारागृहात अतिरिक्त बंदी ३ हजार १९८ इतके आहेत. त्याचे प्रमाण ३८९% इतके आहे.
- मुंबई मध्यवर्ती कारागृहात ८०४ अधिकृत बंदीक्षमता असून प्रत्यक्ष बंदीक्षमता ३ हजार ५८३ इतकी मोठी असून या कारागृहात अतिरिक्त बंदी २ हजार ७७९ इतके आहेत. त्याचे प्रमाण ४४६% इतके आहे.